सत्यमेव जयते

# विधानपरिषद

## विनंती-अर्ज समिती

**“ कोदवली (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील नवीन धरणाचे काम पूर्ण होऊन ग्रामस्थांना योग्य न्याय मिळण्याबाबत ” या विषयावरील श्री. अशोक उर्फ भाई जगताप, वि.प.स. यांच्या विनंती अर्जावरील विधानपरिषद विनंती अर्ज समितीचा अहवाल**

(दिनांक २० डिसेंबर, २०२४ रोजी विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई/नागपूर
डिसेंबर, २०२४

# विधानपरिषद

# विनंती-अर्ज समिती

२०२३-२०२४

**“ कोदवली (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील नवीन धरणाचे काम पूर्ण होऊन ग्रामस्थांना योग्य न्याय मिळण्याबाबत ” या विषयावरील श्री. अशोक उर्फ भाई जगताप, वि.प.स. यांच्या विनंती अर्जावरील विधानपरिषद विनंती अर्ज समितीचा अहवाल**

**विनंती अर्ज समिति**

(२०२३-२०२४)

| अ.क्र. | सदस्यांचे नावे |
|---|---|
| १) | **डॉ.नीलम लतिका दिवाकर गोऱ्हे, उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख** |
| * २) | रिक्त |
| ३) | श्रीमती उमा खापरे, वि.प.स. |
| **४) | रिक्त |
| ***५) | रिक्त |
| | **विशेष निमंत्रित** |
| १) | श्री. सचिन अहिर, वि.प.स. |
| ****२) | रिक्त |
| ३) | श्री. सत्यजित तांबे, वि.प.स. |
| ४) | श्री. राजेश राठोड, वि.प.स. |

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयः-**

श्री. जितेंद्र भोळे, सचिव(१)(कार्यभार)

डॉ. विलास आठवले, सचिव (२)(कार्यभार)

श्री. सुरेश मोगल, अवर सचिव (समिती)

श्रीमती सुषमा लोंढे, कक्ष अधिकारी

---

* श्री. निलय नाईक, वि.प.स. यांची दिनांक २७ जुलै,२०२४ रोजी सदस्यत्वाची मुदत संपल्याने पद रिक्त आहे.

** श्री. अनिकेत तटकरे, वि.प.स. यांची दिनांक ३१ मे, २०२४ रोजी सदस्यत्वाची मुदत संपल्याने पद रिक्त आहे.

*** डॉ. प्रज्ञा सातव, वि.प.स. यांची दिनांक २७ जुलै,२०२४ रोजी सदस्यत्वाची मुदत संपल्याने पद रिक्त आहे.

**** श्री. महादेव जानकर, वि.प.स. यांची दिनांक २७ जुलै,२०२४ रोजी सदस्यत्वाची मुदत संपल्याने पद रिक्त आहे.

## अनुक्रमणिका


| अनु. क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | (सात) |
| २. | अहवाल | १ |
| ३. | अभिप्राय व शिफारशी | ३ |
| ४. | मूळ विनंती अर्ज (परिशिष्ट - १) | ५ |
| ५. | विभागाकडून प्राप्त झालेली माहिती (परिशिष्ट - २) | १३ |
| ६. | समितीच्या बैठका (परिशिष्ट - ३) | २५ |

## प्रस्तावना

"कोदवली (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील नवीन धरणाचे काम पूर्ण होऊन ग्रामस्थांना योग्य न्याय मिळण्याबाबत" या विषयावरील विनंती अर्जाची सूचना सन्माननीय सदस्य श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. यांनी दिनांक १४ जून, २०२४ रोजी दिली व प्रस्तुतचा विनंती अर्ज सन्माननीय सदस्यांनी दिनांक ०४ जुलै, २०२४ रोजी विधानपरिषदेस सादर केला. सदर विनंती अर्ज त्याच दिवशी विनंती अर्ज समितीकडे सूपूर्द करण्यात आला. **(परिशिष्ट-एक)**

विनंती अर्जात उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांबाबत शासनाकडून आवश्यक ती माहिती मिळावी म्हणून उक्त विनंती अर्ज नगरविकास विभागाकडे दिनांक ०४ जुलै, २०२४ रोजी पाठविण्यात आला. या संबंधिची माहिती नगरविकास विभागाकडून दिनांक ०९ जुलै, २०२४ व दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२४ रोजी प्राप्त झाली.

समितीने विनंती-अर्जाच्या संदर्भात विनंती अर्ज सादर करणाऱ्या मूळ विनंती अर्जदारांच्या तसेच विभागीय सचिव व अन्य अधिकाऱ्यांच्या दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२४ रोजी साक्षी नोंदविल्या.

विनंती अर्जासंबंधी विभागाने पाठविलेली माहिती **(परिशिष्ट-दोन)** तसेच साक्षीच्या वेळी समितीस मिळालेली अधिक माहिती याचा सर्वंकष विचार करून समितीने अहवाल तयार केला व दिनांक १९ डिसेंबर, २०२४ रोजीच्या बैठकीत संमत केला.

**विधान भवन,**
नागपूर.
दिनांक १९ डिसेंबर, २०२४.

**डॉ. नीलम लतिका दिवाकर गोऱ्हे,**
उप सभापती तथा समिती प्रमुख
विधानपरिषद विनंती अर्ज समिती

# अहवाल

मी, विधानपरिषद विनंती-अर्ज समितीची समिती प्रमुख, समितीच्यावतीने हा अहवाल सादर करीत आहे.

**"कोदवली (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील नवीन धरणाचे काम पूर्ण होऊन ग्रामस्थांना योग्य न्याय मिळण्याबाबत"** या विषयावरील विनंती अर्जाची सूचना सन्माननीय सदस्य श्री. अशोक उर्फ भाई जगताप, वि.प.स. यांनी दिनांक १४ जून,२०२४ रोजी दिली. सदर विनंती अर्ज दिनांक ४ जुलै,२०२४ रोजी सन्माननीय सदस्यांनी विधानपरिषदेस सादर केला. सदर विनंती अर्ज त्याच दिवशी विनंती अर्ज समितीकडे सुपूर्द करण्यात आला. **(परिशिष्ट-एक)**

अर्जदारांनी विनंती अर्जात नमूद केले आहे की, मागील पावसाळी अधिवेशनात दिनांक ११ जुलै,२०२३ रोजी सभागृहात राजापूर येथील नवीन धरणाचे काम अपूर्ण असल्याबाबतचा मुद्दा लक्षवेधी सूचनेद्वारे उपस्थित केला होता. त्या कामासंदर्भात अद्यापही कोणतीच प्रगती झालेली नसल्याने तेथील ग्रामस्थांनी विनंती अर्ज सादर केला आहे.

सबब, कोदवली ( ता.राजापूर, जि.रत्नागिरी ) येथील धरणाचे काम पूर्ण करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी, अशी विनंती त्यांनी अर्जात केलेली आहे.

**समितीने सदर विनंती अर्जाची प्रत दिनांक ०४ जुलै, २०२४ रोजी नगरविकास विभागास पाठवून तद्संदर्भातील माहिती मागविली असता नगरविकास विभागाने समितीच्या दिनांक ०९ जुलै, २०२४ तसेच दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२४ रोजी झालेल्या बैठकीच्या वेळी पाठविलेली माहिती (परिशिष्ट-दोन) मध्ये समाविष्ट केली आहे.**

प्रस्तुत विनंती अर्जाच्या अनुषंगाने विधानपरिषद विनंती अर्ज समितीने नगरविकास विभागाचे उप सचिव/अन्य अधिकारी तसेच मूळ अर्जदार यांची गुरुवार, दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२४ रोजी विधान भवन, मुंबई येथे साक्ष घेतली.

सदर बैठकीत समितीने प्रस्तुत विनंती अर्जाच्या अनुषंगाने झालेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती समितीच्या निदर्शनास आणून देण्याबाबत सांगितले असता विभागीय उप सचिव यांनी विनंती अर्जात नमूद असलेले धरण हे राजापूर तालुक्यातील पाणी पुरवठा करणारे धरण आहे. पूर्वी या धरणासाठी १० कोटी रुपये निधीचा प्रस्ताव होता. त्यानुसार या धरणासाठी १० कोटी रुपये निधी वितरित केला होता. सद्यःस्थितीत सदर धरणाचे भौतिक काम ७५ टक्के पूर्ण झाले आहे. दरम्यान नगर परिषद, राजापूर यांच्याकडून माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये एक प्रस्ताव आला. त्यात नमूद होते की, या धरणाची अजून काही कामे गृहीत धरण्यात आलेली नाहीत. त्यांच्याकडून या प्रकल्पाच्या अन्य कामांसाठी ०८.१८ कोटी रुपये वाढीव निधीची मागणी करण्यात आली होती. नगर परिषद, राजापूर यांनी सादर केलेला प्रस्ताव विभागाने शासनाच्या मंजुरीसाठी सादर केला होता. शासनाकडून सदरहू प्रस्तावाला मंजुरी प्राप्त झाली असून दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२४ रोजी निधी मंजूरीचा आदेश निर्गमित करण्यात आला आहे.

उक्त अर्जाच्या अनुषंगाने विनंती अर्जात नमूद अर्जदाराने मा. मुख्यमंत्री यांना तसेच मा. उद्योग मंत्री यांना देखील निवेदन सादर केले असल्याचे समितीने सांगितले असता विभागाने प्रस्तुत प्रकरणी विभागास निवेदन प्राप्त झाले असल्याचे समितीस सांगितले.

यावर समितीने अशी विचारणा केली की, या धरणासाठी ०८.१८ कोटी रुपयांचा वाढीव निधी मंजूर करण्यात आला आहे. उक्त निधीतून प्रकल्पाची उर्वरित कामे किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहेत तद्नुषंगाने मुख्याधिकारी, नगर परिषद, राजापूर यांनी समितीस अशी माहिती दिली की, या धरणाच्या कामाचे साधारणतः ९ उपांग आहेत. सध्या

सुरु असलेल्या कामाच्या अनुषंगाने ते सर्व एकच आहेत. या कामाची पुन्हा नव्याने निविदा काढण्यात येणार आहे. निविदा प्रसिद्ध केल्यानंतर धरणाचे उर्वरित काम कंत्राटदाराकडून उत्तम दर्जाचे करून घेतले जाणार आहे. लगतच्या काळात आचारसंहिता लागणार आहे. त्यामुळे पुढील तीन-चार महिन्यात या संदर्भातील कार्यवाही पूर्ण होऊ शकते. पुढील पावसाळ्यापूर्वी सदरहू धरणाचे काम पूर्ण होईल असे समितीस विदित केले.

माजी वि.प.स. सदस्या तथा अर्जदार ॲड. (श्रीमती) हुस्नबानु खलिफे यांनी समितीचे आभार मानत असताना समितीसमोर सांगितले की, शासनाने निर्गमित केलेल्या एका शासन निर्णयाच्या माध्यमातून जवळजवळ १० हजार लोकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निकाली निघणार आहे. कोकणात पिण्याच्या पाण्याची परिस्थिती फार वाईट आहे. या भागात पावसाळ्यामध्ये पुराची परिस्थिती असते आणि माहे मार्च ते मे या तीन महिन्यांत मात्र पाणीच नसते. अशाप्रकारे राजापूरची विचित्र परिस्थिती आहे. सायबा धरण हे ब्रिटिशांनी बांधले होते. त्यावेळी त्या धरणातून नैसर्गिक स्त्रोताने पाणी पुरवठा होत होता. ती जागा अशी होती की, तेथे परत धरण बांधले तर संपूर्ण शहराला नैसर्गिक स्त्रोताने पाणी पुरवठा होईल. सद्यःस्थितीत या धरणाची मान्यता घेण्यात आली आहे. सदरहू विनंती अर्ज सादर होण्यापूर्वी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. तत्कालीन मा. मुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री यांनी या कामासाठी प्रथम १० कोटी रुपये निधी दिला होता. तसेच सदरहू काम सुरु झाल्यानंतर पुन्हा निधी उपलब्ध करून देण्यात येईल असे आश्वासित केले होते. आज अशी परिस्थिती आहे की, सदरहू धरण अर्धवट अवस्थेत आहे. कित्येक महिन्यांपासून पुढील काम होत नव्हते. परंतु वारंवार करण्यात आलेल्या पाठपुराव्यामुळे व निधी मंजूर झाल्यामुळे आता धरणाचे काम पूर्ण होणार आहे. यातून या भागातील लोकांना ९० पट जास्त पाणी मिळणार आहे. त्यामुळे शहराला २४ तास पाणी पुरवठा होऊ शकतो. या प्रकल्पासाठी शासनाने सहकार्य करून राजापूर शहराचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमचा सोडविल्याबद्दल मा. उद्योग मंत्री, मा. गृह मंत्री, समिती तसेच सर्व अधिकारी यांचे आभार मानले. तसेच मा.मुख्यमंत्री यांनी सकारात्मक शेरा नमूद करून या कामी सहकार्य केल्याबद्दल त्यांचे आणि प्रशासनाचे विशेष आभार मानले व समाधान व्यक्त केले.

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने समितीने बैठक घेवून विनंती अर्ज दाखल करून घेतला आणि त्या विषयी सातत्याने पाठपुरावा केला. मा. मुख्यमंत्री यांनी याप्रकरणी प्रशासनास निदेश दिल्यामुळे प्रशासनाने याबाबतची सर्व कार्यवाही करून प्रत्यक्षात या प्रक्रियेला गती दिली. तसेच लोकांचे जे प्रश्न सभागृहात सुटत नाहीत ते विनंती अर्ज समितीच्या माध्यमातून सुटावेत हा समितीचा हेतू असतो असे नमूद करून सदर महत्वाचा प्रश्न सोडविण्याकरिता मा. मुख्यमंत्री, मा. मंत्री महोदय, मा. माजी वि.प.स. सदस्या तथा अर्जदार ॲड. (श्रीमती) हुस्नबानु खलिफे, नगरविकास विभाग, राजापूर नगर परिषद आणि महाराष्ट्र शासन यांच्या सकारात्मक भूमिकेबाबत समाधान व्यक्त करून आभार मानले.

विभागाच्या उप सचिवांनी समितीसमोर साक्ष देताना समितीस अशी माहिती दिली की, राजापूर, नगर परिषदेच्या मुख्याधिकारी यांच्याकडून माहिती घेतली असता या धरणाच्या उर्वरित कामांबाबत लवकरच निविदा काढण्यात येणार आहे. यामध्ये सुधारित प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, अनेक वेळा प्रश्न सभागृहात मांडून सुटत नाहीत. नंतर ते विषय विनंती अर्ज समितीकडे येतात. त्या विषयाचा अर्ज स्वीकारणे ही फार मोठी यशाची बाब आहे. अर्ज स्वीकारुन विनंती अर्ज समितीकडे सादर केला व त्यावरील कार्यवाही पूर्ण केली आहे. त्यामुळे समितीने माजी वि.प.स. सदस्या तथा अर्जदार ॲड. (श्रीमती) हुस्नबानु खलिफे यांचे आभार व्यक्त करून प्रशासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत देखील समाधान व्यक्त केले. प्रशासनाने जनतेच्या पिण्याच्या पाण्यासंदर्भात तत्परतेने काम करून निधी उपलब्ध करून दिल्याबाबत समितीने समाधान व्यक्त केले तसेच याप्रकरणी मा. मुख्यमंत्री मा. उद्योग मंत्री, मा. गृह मंत्री महोदय यांनी प्रशासनास तातडीने काम करण्याचे निदेश दिल्याबद्दल समितीने त्यांचे मनापासून आभार व्यक्त केले.

**अभिप्राय व शिफारशी**

श्री. अशोक उर्फ भाई जगताप, वि.प.स. यांनी कोदवली (ता. राजापूर, जि.रत्नागिरी) येथील नवीन धरणाचे काम पूर्ण होऊन ग्रामस्थांना योग्य न्याय मिळण्याबाबतचा विनंती अर्ज समितीस सादर केला होता.

दिनांक ०३ ऑक्टोबर,२०२४ रोजी झालेल्या साक्षीच्या वेळी विभागीय उप सचिवांनी सदर विनंती अर्जासंदर्भातील विषयाबाबत समितीस माहिती दिली की, सदरहू धरण राजापूर तालुक्यातील पाणी पुरवठा करणारे धरण आहे. पूर्वी या धरणासाठी १० कोटी रुपये निधीचा प्रस्ताव होता. त्यानुसार या धरणासाठी १० कोटी रुपये निधी वितरित केला होता. सद्यःस्थितीत सदर धरणाचे भौतिक काम ७५ टक्के पूर्ण झाले आहे. दरम्यान नगर परिषद, राजापूर यांच्याकडून माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये एक प्रस्ताव आला. त्यात नमूद होते की, या धरणाची अजून काही कामे गृहीत धरण्यात आलेली नाहीत. त्यांच्याकडून या प्रकल्पाच्या अन्य कामांसाठी ०८.१८ कोटी रुपये वाढीव निधीची मागणी करण्यात आली होती. नगर परिषद, राजापूर यांनी सादर केलेला प्रस्ताव विभागाने शासनाच्या मंजुरीसाठी सादर केला होता. शासनाकडून सदरहू प्रस्तावाला मंजुरी प्राप्त झाली असून दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२४ रोजी निधी मंजूरीचा आदेश निर्गमित करण्यात आला आहे. या धरणाच्या कामाचे साधारणतः ९ उपांग आहेत. सध्या सुरु असलेल्या कामाच्या अनुषंगाने ते सर्व एकच आहेत. मुख्याधिकारी यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार जी उर्वरित कामे आहेत त्यांची निविदा काढण्यात येणार आहे. यामध्ये सुधारित प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. निविदा प्रसिद्ध केल्यानंतर धरणाचे उर्वरित काम कंत्राटदाराकडून उत्तम दर्जाचे करून घेतले जाणार आहे. लगतच्या काळात आचारसंहिता लागणार आहे. त्यामुळे पुढील तीन-चार महिन्यात या संदर्भातील कार्यवाही पूर्ण होऊ शकते. पुढील पावसाळ्यापूर्वी सदरहू धरणाचे काम पूर्ण होईल.

**शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या माध्यमातून जवळजवळ १० हजार लोकांचा पिण्याचा पाण्याचा प्रश्न निकाली लागणार आहे. सायबा हे धरण ब्रिटिशांनी बांधले होते. त्यावेळी धरणातून नैसर्गिक स्त्रोताने पाणी पुरवठा होत होता. ती जागा अशी होती की, तेथे परत धरण बांधले तर संपूर्ण शहराला नैसर्गिक स्त्रोताने पाणी पुरवठा होईल. तत्कालीन मा. मुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री यांनी या कामासाठी प्रथम १० कोटी रुपये निधी दिला आहे. गेल्या कित्येक वर्षापासून सदरहू धरण अर्धवट अवस्थेत आहे. त्याचप्रमाणे गेल्या कित्येक महिन्यांपासून या धरणाचे काम प्रलंबित आहे. विनंती अर्जातील अर्जदारांच्या वारंवार करण्यात आलेल्या पाठपुराव्यामुळे मा. मुख्यमंत्री व मा. उद्योग मंत्री यांनी दिलेल्या आदेशान्वये निधी मंजूर झाल्यामुळे आता धरणाचे काम पूर्ण होणार आहे. यातून या भागातील लोकांना ९० पट जास्त पाणी मिळणार आहे. त्यामुळे शहराला २४ तास पाणी पुरवठा होणार असल्यामुळे शहरातील जनतेचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमचा सुटणार आहे.**

**आता शासनाने सुमारे ०८.१८ कोटी रुपयांची तरतूद प्रस्तुत धरणाच्या प्रलंबित कामासाठी केली असल्यामुळे प्रशासनाने याप्रकरणी तत्परतेने निविदा प्रक्रीया राबवून उर्वरित काम तातडीने पूर्ण करावे तसेच याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस एक महिन्याच्या आत कळविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

## परिशिष्ट एक

# मूळ विनंती अर्ज

महाराष्ट्र विधानपरिषद

विधानपरिषद
महाराष्ट्र

**भाई जगताप**
**विधान परिषद सदस्य, महाराष्ट्र राज्य**
कार्यालय : ५, नवलकर लेन, पहिला मजला, प्रार्थना समाज, गिरगांव, मुंबई - ४०० ००४.
दूरध्वनी : २३८५५१२४ / २३८७५४३४
फॅक्स : २३८७५४३३.

१४/०६/२०२४

प्रति,
**मा. उपसभापती,**
**महाराष्ट्र विधान परिषद,**
विधान भवन, मुंबई.

**विषय :- कोदवली, ता.राजापूर, जि.रत्नागिरी येथील नवीन धरणाचे काम पूर्ण होऊन ग्रामस्थांना योग्य न्याय मिळण्याबाबत.**

**महोदय,**

आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, मागील पावसाळी अधिवेशनात दि.११/०७/२०२३ रोजी मी सभागृहात राजापूर येथील नवीन धरणाचे काम अपूर्ण असल्याबाबतचा मुद्दा लक्षवेधी सूचनेद्वारे उपस्थित केला होता. त्या कामासंदर्भात अद्यापही कोणतीच प्रगती झालेली नसल्याने तेथील ग्रामस्थांनी माझ्याकडे विनंती अर्ज सादर केला आहे.

सबब, कोदवली (ता.राजापूर) येथील धरणाचे काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने सोबत जोडलेला अर्ज विनंती अर्ज समितीकडे आपल्या शिफारशींसह पाठविण्यात यावा, ही विनंती.

सचिव (१) (का.)

विधानमंडळ पाठे
सचिव (१) (का.)

डॉ. नीलम गोन्हे
उप सभापती,
महाराष्ट्र विधानपरिषद,
विधान भवन, मुंबई/नागपूर

आपला,

( भाई जगताप )
वि.प.स.

ई-2

पृ.१५

दिनांक - १३/०६/२०२४
राजापूर

प्रति,
**मा. आ. भाई जगताप साहेब**
सदस्य विधानपरिषद,
विधानभवन, मुंबई

**विषय :-** विनंती अर्ज समितीसमोर राजापूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या कोदवली सायबाचे धरणानजिक नवीन धरणाचे काम पूर्ण होणेविषयी बैठक लावणेबाबत.

**संदर्भ :-** पावसाळी अधिवेशन २०२३ मध्ये विधानपरिषद मधील मा. आ.भाई जगताप साहेब लक्षवेधी क्र.२१८

महोदय,

राजापूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या सायबाचे धरण अतिशय जीर्ण झाले असल्यामुळे त्याला मोठ्या प्रमाणात गळती होत आहे. नवीन धरण बांधण्याचे काम हाती घेतलेले आहे. सदर धरणाचे काम अपूर्ण असल्यामुळे ते पूर्ण करण्यासंबंधी आपण पावसाळी अधिवेशनात २०२३ मध्ये लक्षवेधी क्र. २१८ने विषय उपस्थित केला होता. तथापि अद्यापपर्यंत याबाबत कोणताही निर्णय झालेला नाही.

सबब राजापूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या कोदवली सायबाचे धरणानजिक नवीन धरणाचे अपूर्ण काम पूर्ण करण्यासंबंधीचा विषय विनंती अर्ज समितीसमोर घेण्याकरिता मा. उपसभापती विधानपरिषद तथा अध्यक्ष विनंती अर्जसमिती यांचेकडे मागणी करण्यात यावी, अशी विनंती आहे.

आपले विश्वासू,

१) [signature] ॲड. हुस्नबानू खलिफे, माजी सदस्य, विधानपरिषद
२) [signature] ॲड. जमीर [illegible] खलिफे, माजी नगराध्यक्ष, राजापूर न.प.
३) [signature] शाहबाज [illegible] वाघू
४) [signature] [illegible] राम [illegible]
५) [signature] संजय कुवेसकर
६) [signature] सुलतान [illegible] ठाकूर
७) [signature] [illegible] गोंडाळ
८) [signature] प्रशांत [illegible] चव्हाण
९) [signature] दिपीका हीनेश पवार
१०) [signature] सचिन [illegible] बेवरेकर

लक्षवेधीसूचना २१८ —

क्रमांक: २१८ स्थिती: सादर केलेले

सूचना दिल्याचा दिनांक: १२/०७/२०२३ १२:४४:४९

सदस्य: श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप

निर्वाचन क्षेत्र: महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित

मंत्री: नगर विकास मंत्री

विभाग: नगर विकास

विषय: राजापूर तालुक्यातील (रत्नागिरी)सायबाचे धरणानजिक नवीन धरणाचे अपूर्ण काम पूर्ण करण्याकरिता निधी उपलब्ध होण्याबाबत..

प्रश्न:
राजापूर शहराला वर्षानुवर्षे नैसर्गिकरित्या पाणी पुरवठा करणाऱ्या कोदवली येथील ब्रिटिशकालीन सायबाच्या धरणालगत तब्बल १४३ वर्षानंतर नवीन धरण बांधण्याचे काम हाती घेण्यात आले असणे, सद्यस्थितीत धरणाचे जवळपास ७० टक्के काम पूर्ण झाले असले तरी उर्वरित कामासाठी अद्याप सहा कोटी रूपये निधीची अत्यावश्यकता असणे, अर्जुना व कोदवली अशा दोन नद्यांच्या काठावर वसलेल्या राजापूर शहरवासियांना दरवर्षी उन्हाळ्यात पाण्यासाठी वणवण करावी लागत असणे, पावसाळ्यात पूर तर उन्हाळ्यात पाणीटंचाई अशी स्थिती गेली वर्षानुवर्षे राजापूर शहराला भेडसावत असणे, राजापूर शहराला विनासायास पाणी पुरवठा करता यावा म्हणून ब्रिटिश राजवटीत राजापूर शहरापासून चार किलोमीटर अंतरावर असलेल्या कोदवली गावात चाळीस मीटर लांबीचे राजापुरातील कोदवली येथील नवीन धरणाचे बांधकाम स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या प्रयत्नाने सन २०२१ सालात धरणाच्या कामाला प्रत्यक्षात सुरूवात झाली असून सद्यस्थितीत धरणाचे काम अपुऱ्या निधीमुळे ठप्प असणे, जुन्या सायबाच्या धरणाच्या खालील बाजूस हे नवीन धरण बांधले जात असणे या धरणाला दोनही बाजूंनी बॉक्स अबाटमेंट असणार असणे तसेच धरणातील पाणी सोडण्यासाठी दोन बाय तीन मीटर आकाराचे १७ दरवाजे असणार असणे, धरणावर दोन मीटर रूंदीचा फूटब्रीज असणार असणे या धरणामध्ये सुमारे ६५६ सहस्त्र घनमीटर पाणीसाठ्याची क्षमता होणार असणे, धरणाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने चारही बाजूंनी रिटेनिंग वॉल व वरच्या बाजूला के. टी. बंधारा बांधण्याचे प्रस्तावित असणे, सद्यस्थितीत 25 टक्के काम निधीअभावी प्रलंबित असणे या रखडलेल्या कामांसाठी अजूनही सहा कोटींच्या निधीची आवश्यकता असणे, राजापूरवासियांना व शहरवासियांसाठी स्वच्छ व मुबलक पाणी पुरवठा करण्यासाठी धरण्याच्या अर्धवट काम पुर्ण करण्यासाठी आवश्यक असलेला निधी तातडीने उपलब्ध करुन सदरील धरणाचे काम पुर्ण करण्यासाठी करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रीया.

<u>लक्षवेधी सूचना</u>　　**<u>महाराष्ट्र विधानपरिषद</u>**　　<u>द्वितीय अधिवेशन, २०२३</u>

निर्वाचन क्षेत्र : महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित

| | |
|---|---|
| **सदस्यांचे नाव** | **श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप,श्री. अभिजित वंजारी,श्री. राजेश राठोड** |
| **सूचना क्रमांक** | **२०९** |
| **विभाग** | **नगर विकास** |
| **स्थिती** | **<u>वस्तुस्थिती विचारा</u>** |
| **जोडलेल्या लक्षवेधी सूचना** | **<u>२१८</u>** |
| **विषय** | **<u>राजापूर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) कोदवलीतील नवीन धरणासाठी ६ कोटींचा निधी उपलब्ध करुन देणेबाबत</u>** |

राजापूर शहराला वर्षानुवर्षे नैसर्गिकरित्या पाणी पुरवठा करणाऱ्या कोदवली येथील ब्रिटिशकालीन सायबाच्या धरणालग तब्बल १४३ वर्षानंतर नवीन धरण बांधण्याचे काम हाती घेण्यात आले असणे, सद्य:स्थितीत धरणाचे जवळपास ७० टक्के काम पूर्ण झाले असले तरी उर्वरित कामासाठी अद्याप ६ कोटी रूपये निधीची अत्यावश्यकता असणे, अर्जुना व कोदवल अशा दोन नद्यांच्या काठावर वसलेल्या राजापूर शहरवासियांना दरवर्षी उन्हाळ्यात पाण्यासाठी वणवण करावी लाग असणे, पावसाळ्यात पूर तर उन्हाळ्यात पाणीटंचाई अशी स्थिती गेली वर्षानुवर्षे राजापूर शहराला भेडसावत असणे राजापूर शहराला विनासायास पाणी पुरवठा करता यावा म्हणून ब्रिटिश राजवटीत राजापूर शहरापासून चार किलोमीट अंतरावर असलेल्या कोदवली गावात चाळीस मीटर लांबीचे राजापुरातील कोदवली येथील नवीन धरणाचे बांधका स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या प्रयत्नाने सन २०२१ सालात धरणाच्या कामाला प्रत्यक्षात सुरूवात झाली असून सद्य:स्थिती धरणाचे काम अपुऱ्या निधीमुळे ठप्प असणे, जुन्या सायबाच्या धरणाच्या खालील बाजूस हे नवीन धरण बांधले जात असणे या धरणाला दोनही बाजूंनी बॉक्स अबाटमेंट असणे, तसेच धरणातील पाणी सोडण्यासाठी दोन बाय तीन मीटर आकारा १७ दरवाजे असणे, धरणावर दोन मीटर रूंदीचा फूटब्रीज असणे, या धरणामध्ये सुमारे ६५६ सहस्त्र घनमीट पाणीसाठ्याची क्षमता होणार असणे, धरणाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने चारही बाजूनी रिटेनिंग वॉल व वरच्या बाजूला के.टी बंधारा बांधण्याचे प्रस्तावित असणे, सद्य:स्थितीत २५ टक्के काम निधीअभावी प्रलंबित असणे, या रखडलेल्या कामासा अजूनही सहा कोटींच्या निधीची आवश्यकता असणे, राजापूरवासियांना व शहरवासियांसाठी स्वच्छ व मुबलक पाणी पुरवठ करण्यासाठी धरण्याचे अर्धवट काम पुर्ण करण्यासाठी आवश्यक असलेला निधी तातडीने उपलब्ध करुन सदरील धरणा काम पूर्ण करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रीया.

............................................................................................................................

| | | |
|---|---|---|
| **सहायक** | **वस्तुस्थिती विचारा** | **<p></p>विभागाकडून दोन दिवसात वस्तुस्थिती मागविण्यात यावी** |
| **कक्ष अधिकारी**<br>(श्री. मंदार - शेमणकर) | **वस्तुस्थिती विचारा** | **<p></p>विभागाकडून दोन दिवसात वस्तुस्थिती मागविण्यात यावी** |
| **अवर सचिव**<br>(कुमारी पुष्पा दळवी) | **वस्तुस्थिती विचारावा** | **<p></p>विभागाकडून दोन दिवसात वस्तुस्थिती मागविण्यात यावी** |
| **उप सचिव**<br>(श्री. ऋतुराज - कुडतरकर) | **वस्तुस्थिती विचारावा** | |
| **सचिव-२ (का.)**<br>(श्री. विलास आठवले) | **वस्तुस्थिती विचारावा** | |
| **सचिव-१ (का.)** | **वस्तुस्थिती विचारावा** | |

**(स्वीकृत / अस्वीकृत / चर्चा करावा)**

**मा.उप सभापती**

पृ/१३

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
४ था मजला, मुख्य इमारत, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
Email ID : ud16-urban@mah.gov.in

क्रमांक :-लवेसू-२०२३/प्र.क्र.५५०(भाग-१)/नवि-१६ (ई-६९७१२१) दिनांक :- २६.०६.२०२४

प्रति,
कक्ष अधिकारी,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
मुंबई

विषय :-श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप व इतर वि.प.स. यांनी म.वि.प नियम १०१ अन्वये लक्षवेधी सूचना क्र. २१८
राजापूर तालूक्यातील कोंदवली येथील ब्रिटिशकालीन सायबाच्या धरणाचे काम पुर्ण करण्यावाबत

संदर्भ :- महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे पत्र क्र.निरंक/ई-२,दि. निरंक

महोदय,

उपरोक्त विषयाबावत श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप व इतर वि.प.स. यांनी सन २०२३ च्या पावसाळी अधिवेशनात दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २१८ संदर्भाधीन पत्रान्वये प्राप्त आहे. प्रस्तुत लक्षवेधी सूचनेची वस्तूस्थिती खालीलप्रमाणे आहे:-

नगरपालिका/ नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी विशेष अनुदान (२२१७१३०१) योजनेअंतर्गत नगरपरिषदांना निधी वितरीत करण्यात येतो. या योजनेंतर्गत राजापूर नगरपरिषद, जि. रत्नागिरी यांना सन २०१७-१८ करीता शासन निर्णय क्र.नपावै २०१७/प्र.क्र.१७२ व (२६) दिनांक २६ मार्च, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये १०.०० कोटी निधी "राजापूर शहर पाणीपुरवठा नवीन धरण" या कामाकरीता वितरीत करण्यात आले आहेत.

जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्याकडून प्रशासकीय मान्यता प्राप्त करुन घेऊन ई-निविदा अंतिम करण्यात आली होती. सुधारित अंदाजपत्रकानुसार सदर काम रु.१०.६९ कोटीचे झाले. प्रत्यक्ष काम करतांना नगर परिषद नियुक्त तांत्रिक व्यवस्थापन सल्लागार यांच्या अहवालानुसार खोदाई जादा करावी लागली व त्याअनुषंगाने पाईलचे, एम. एस. लायनरचे, डीवॉटरींग व कॉंक्रिटचे काम जादा प्रमाणात करणे क्रमप्राप्त झाले.सबब,मंजूर आराखड्यानुसार धरणाचे काम गेटलेव्हलपर्यंतच पूर्ण करणे शक्य झाले व याकामी मंजूर अनुदान पूर्ण खर्च पडले आहेत.

सद्यस्थितीत काम ७५ टक्के पूर्ण आहे. तांत्रिक व्यवस्थापन सल्लागार यांचे अहवालानुसार अंदाजपत्रकानुसार १७ गेटचे राहीलेले काम करणे, कॉक्रिट एम-३०, पी.सी.सी ट्रीटमेंट, एम.एस. पाईप लाईन, धरणावर जाणेसाठी कॉक्रिट पोच रस्ता इत्यादी वाढीव कामे करणेकरीता कामांचे अंदाजपत्रक तयार करण्याचा प्रस्ताव नगरपरिषदेने मृदा व जलसंधारण विभागाकडे प्रस्ताव सादर केला आहे.

आपला,

(अविनाश शितोळे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

# परिशिष्ट दोन

# विभागाने सादर केलेली माहिती

ार्च

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
४ था मजला, मुख्य इमारत, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
Email ID : ud१६-urban@mah.gov.in

क्रमांक :-संकिर्ण-२०२४/प्र.क्र.१९८ / नवि-१६ दिनांक :- ०९.०७.२०२४

प्रति,
कक्ष अधिकारी,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
मुंबई

विषय :- "कोदवली ता.राजापूर, जि. रत्नागिरी येथील नवीन धरणाचे काम पूर्ण काम पुर्ण होऊन ग्रामस्थांना योग्य न्याय मिळण्याबाबत" श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप (वि.प.स.) यांचा विनंती आर्ज

संदर्भ :- आपले पत्र क्र.७४९२/म.वि.स./ड-१५ दि. ०४ जुलै , २०२४

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप (वि.प.स.) यांनी सन २०२३ च्या पावसाळी अधिवेशनात दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २१८ अन्वये राजापूर येथील नवीन धरणाचे काम अपूर्ण असल्याचाबाबत मुद्दा उपस्थित केला आहे. प्रस्तुत लक्षवेधी सूचनेची वस्तूस्थिती खालीलप्रमाणे आहे:-

नगरपालिका/ नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी विशेष अनुदान (२२१७१३०१) योजनेअंतर्गत नगरपरिषदांना निधी वितरीत करण्यात येतो. या योजनेंतर्गत राजापूर नगरपरिषद, जि. रत्नागिरी यांना सन २०१७-१८ करीता शासन निर्णय क्र.नपावै २०१७/प्र.क्र.१७२ ब (२६) दिनांक २६ मार्च, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये १०.०० कोटी निधी "राजापूर शहर पाणीपुरवठा नवीन धरण" या कामाकरीता वितरीत करण्यात आले आहेत.

जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्याकडून प्रशासकीय मान्यता प्राप्त करुन घेऊन ई-निविदा अंतिम करण्यात आली होती. सुधारित अंदाजपत्रकानुसार सदर काम रु.१०.६९ कोटीचे झाले. प्रत्यक्ष काम करतांना नगर परिषद नियुक्त तांत्रिक व्यवस्थापन सल्लागार यांच्या अहवालानुसार खोदाई ज़ादा करावी लागली व त्याअनुषंगाने पाईलचे, एम. एस. लायनरचे, डीवॉटरींग व कॉक्रिटचे काम जादा प्रमाणात करणे क्रमप्राप्त झाले.सबब,मंजूर आराखड्यानुसार धरणाचे काम गेटलेव्हलपर्यंतच पूर्ण करणे शक्य झाले व याकामी मंजूर अनुदान पूर्ण खर्च पडले आहेत.

सद्यस्थितीत काम ७५ टक्के पूर्ण आहे. तांत्रिक व्यवस्थापन सल्लागार यांचे अहवालानुसार अंदाजपत्रकानुसार १७ गेटचे राहीलेले काम करणे, कॉक्रिट एम-३०, पी.सी.सी ट्रीटमेंट, एम.एस.

पाईप लाईन, धरणावर जाणेसाठी कॉक्रिट पोच रस्ता इत्यादी वाढीव कामे करणेकरीता रु. ७.०० कोटी अधिकच्या निधीची आवश्यकता असून याअनुषंगाने शासन स्तरावर प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

आपला,

(श्रीकांत आंडगे)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

का.प्र.
9/7/24
2.30pm

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
४ था मजला, मुख्य इमारत, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
Email ID : ud१६-urban@mah.gov.in

क्रमांक :-संकिर्ण-२०२४/प्र.क्र.१९८ /नवि-१६ (ई ८०७७०६) दिनांक :- ०३ ऑक्टोंबर,२०२४

प्रति,

कक्ष अधिकारी,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
मुंबई

विषय :- "कोदवली ता.राजापूर, जि. रत्नागिरी येथील नवीन धरणाचे काम पूर्ण काम पुर्ण होऊन ग्रामस्थांना योग्य न्याय मिळण्याबाबत" श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप (वि.प.स.) यांचा विनंती आर्ज

संदर्भ :- १) आपले पत्र क्र.७४९२/म.वि.स./ड-१५ दि. ०४ जुलै , २०२४
२) आपले पत्र क्र.७४९२/म.वि.स./ड-१५ दि. ३० सप्टेंबर, २०२४
३) शासनाचे सम क्रमांकचे पत्र दि. ०१ ऑक्टोबर, २०२४

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भ क्र २ च्या पत्रान्वये आपण विधानपरिषद विनंती अर्ज समितीची गुरुवार दि. ०३ ऑक्टोंबर २०२४ रोजी, दुपारी ०३.०० वाजाता बैठक आयोजित केली असल्याचे नमूद करुन विषयांकीत विनंती अर्जाबाबत विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येणार असल्याचे नमूद केले आहे. त्याचप्रमाणे विनंती अर्जातील विषयाबाबत अद्यायावत माहितीच्या ४० प्रती सचिवालयास पाठविण्याची व्यवस्था करण्याची विनंती केली असता सदरची माहिती संदर्भ क्रमांक ३ अन्वये महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयास उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

याबाबतची सुधारित माहिती सोबत जोडली आहे.

आपला,

(श्रीकांत आंडगे)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

माहिती प्राप्त.
3/10/24

नगर विकास विभाग /नवि १६

विषय:- कोदवली ता.राजापूर, जि. रत्नागिरी येथील नवीन धरणाचे काम पूर्ण होऊन ग्रामस्थांना योग्य न्याय मिळण्याबाबत" श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप (वि.प.स.) यांचा विनंती अर्जाच्या अनुषंगाने आयोजीत बैठकीसाठी अद्यायावत माहिती सादर करण्याबाबत..

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २१८ व विनंती अर्जची वस्तूस्थिती खालीलप्रमाणे आहे.

नगरपालिका/ नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी विशेष अनुदान (२२१७१३०१) योजनेअंतर्गत नगरपरिषदांना निधी वितरीत करण्यात येतो. या योजनेंतर्गत राजापूर नगरपरिषद, जि. रत्नागिरी यांना सन २०१७-१८ करीता शासन निर्णय क्र.नपावै २०१७/प्र.क्र.१७२ ब (२६) दिनांक २६ मार्च, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये १०.०० कोटी निधी "राजापूर शहर पाणीपुरवठा नवीन धरण" या कामाकरीता वितरीत करण्यात आले आहेत.

जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्याकडून प्रशासकीय मान्यता प्राप्त करुन घेऊन ई-निविदा अंतिम करण्यात आली होती. सुधारित अंदाजपत्रकानुसार सदर काम रु.१०.६९ कोटीचे झाले. प्रत्यक्ष काम करतांना नगर परिषद नियुक्त तांत्रिक व्यवस्थापन सल्लागार यांच्या अहवालानुसार खोदाई जादा करावी लागली व त्याअनुषंगाने पाईलचे, एम. एस. लायनरचे, डीवॉटरींग व कॉक्रिटचे काम जादा प्रमाणात करणे क्रमप्राप्त झाले.सबब,मंजूर आराखड्यानुसार धरणाचे काम गेट लेव्हलपर्यंतच पूर्ण करणे शक्य झाले असून मंजूर अनुदान पूर्णता खर्च झाले आहेत.

सद्यस्थितीत काम ७५ टक्के पूर्ण आहे. तांत्रिक व्यवस्थापन सल्लागार यांचे अहवाल व अंदाजपत्रकानुसार १७ गेटचे राहीलेले काम करणे, कॉक्रिट एम-३०, पी.सी.सी ट्रीटमेंट, एम.एस. पाईप लाईन, धरणावर जाणेसाठी कॉक्रिट पोच रस्ता इत्यादी वाढीव कामे करणेकरीता कामांचे सुधारीत अंदाजपत्रकनुसार नगरपरिषद राजापूर यांनी रु. ८.१८ कोटी अधिकच्या निधीची मागणीच्या अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक नपावै २०२४/प्र.क्र२२५(३३)/नवि१६(ई ८१८८५६) दि.०३ ऑक्टोबर २०२४ अन्वये "राजापूर शहर पाणीपुरवठा धरणाचे (कोदवली सायबाचे धरण) उर्वरित बांधकाम करणे" या कामासाठी रु.८.१८ कोटी निधी मंजूर करण्यात आला आहे.

*************

"वैशिष्ट्यपूर्ण" योजनेअंतर्गत नगरपरिषदांना
निधी मंजूर करण्याबाबत.
सन २०२४-२५ लेखाशिर्ष (४२१७ ०६०३) अंतर्गत
राजापूर नगरपरिषद, जि. रत्नागिरी करिता
रक्कम रु.८.१८ कोटी

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः-नपावै-२०२४/प्र.क्र.२२५(३३)/नवि-१६ (ई- ८१८८५६)
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ०३ ऑक्टोंबर, २०२४

संदर्भ :-

(१) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक:- धोरण-२०१७/प्र.क्र.१७१/नवि-१६, दि. १७ नोव्हेंबर,२०१७ व दि. ३० सप्टेंबर, २०२०

(२) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक:- नपावै-२०१७/प्र.क्र.१७२-ब(२६)/नवि-१६, दि. २६ मार्च, २०१८

(३) मुख्याधिकारी, राजापूर नगरपरिषद यांचे पत्र क्र.जा.क्र./बांधकाम/४००/२०२३-२४ दि.२४ फेब्रुवारी, २०२४

प्रस्तावना :-

राज्यातील नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान देण्यात येते. सदर योजनेचे सुधारीत निकष व मार्गदर्शक तत्वे संदर्भाधीन क्रमांक (१) येथील शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेले आहेत. संदर्भाधीन क्र.(२) अन्वये राजापूर नगरपरिषद क्षेत्रात "राजापूर शहर पाणीपुरवठा नविन धरण (कोदवली सायबाचे धरण)" बांधणेकामी रु.१०.०० कोटी निधी उपलब्ध करुन दिला असून उर्वरीत काम पूर्ण करण्यासाठी रु.८.१८ कोटी निधी "वैशिष्ट्यपूर्ण" या योजनेअंतर्गत राजापूर नगरपरिषदेस निधी मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याअनुषंगाने पुढीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

**"नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान"** या योजनेंतर्गत राजापूर नगरपरिषद जि.रत्नागिरी करिता **"राजापूर शहर पाणीपुरवठा नविन धरणाचे (कोदवली सायबाचे धरण) उर्वरीत बांधकाम करणे." या कामासाठी रक्कम रु.८,१८,००,०००/-** (अक्षरी रक्कम रु. आठ कोटी अठरा लक्ष मात्र) इतका निधी सदर कामाकरीता मंजूर करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर प्रकल्प खर्चाचा १००% हिस्सा राज्य शासनाचा राहणार आहे. त्यामुळे सदर प्रकल्पाअंतर्गत निश्चित करण्यात आलेल्या कामांना एकत्रित प्रकल्प खर्चाच्या मर्यादेत सक्षम प्राधिका-यांची तांत्रिक मान्यता प्राप्त झाली असल्याची खातरजमा संबधित जिल्हाधिकारी यांनी करुन घ्यावी व संदर्भाधीन क्र.(१) येथील शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान करावी.

३. या शासन निर्णयातील कामांची कार्यान्वयन यंत्रणा "नगरपरिषद" राहील.

४. सदर शासन निर्णयानुसार प्रत्येक कामाच्या रक्कम रू.१०.०० लक्ष अथवा त्यापेक्षा जास्त किमतीस मान्यता देण्यात आली आहे. सबब, तांत्रिक मान्यता दिलेल्या प्रत्येक कामाच्या रक्कम रू. १०.०० लक्ष अथवा त्यापेक्षा जास्त किमतीच्या प्रत्येक कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात करण्यात यावी. एखाद्या कामाची तांत्रिक मान्यता कमी किंमतीची (रू. १० लक्ष पेक्षा कमी किंमतीचे काम) असल्यास सदर कामे एकत्रित करून प्रशासकीय मान्यता (Package) प्रदान करण्यात यावी. सदर एकत्रित प्रशासकीय मान्यतेची ई-निविदा करणे अपेक्षित आहे. प्रत्येक काम ई-निविदेने करणे बंधनकारक असून, प्रशासकीय मान्यतेच्या (Package) रकमेचे पुनश्चः विलगीकरण (Splitting) करून कार्यादेश देणे ही गंभीर अनियमितता समजण्यात येईल व याची जबाबदारी संबधित जिल्हाधिकारी यांची राहील.

५. सदर योजनेअंतर्गत करण्यात येणारी कामे अन्य कोणत्याही योजनेतून अथवा स्व:उत्पन्नातून होत नाहीत याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करून घ्यावी. कोणत्याही परिस्थितीत कामांची दुरूक्ती होणार नाही याची दक्षता जिल्हाधिकारी यांनी घ्यावी.

६. सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांच्या "ई-निविदा" अंती प्रकल्प खर्च निश्चित करण्यात यावा. सदरचा प्रकल्प खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा जास्तीचा असल्यास, अशा जास्तीच्या खर्चासाठी कुठल्याही स्वरुपात अतिरिक्त अनुदान शासनाकडून उपलब्ध करुन दिले जाणार नाही.

७. "ई-निविदा" अंतीचा प्रकल्प खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा कमी असल्यास, सदर कमी झालेल्या खर्चाच्या राज्य शासन हिस्स्याची रक्कम शासनास जमा करावी. सदरची जबाबदारी आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील. प्रत्येक काम किमान रू.१० लक्ष किंमतीचे राहील याची दक्षता घेण्यात यावी.

८. जिल्हाधिकारी, यांची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील:-

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे ही सार्वजनिक मालकीच्या ठिकाणीच करावीत, कामाचे स्वरुप सार्वजनिक असावे, तसेच त्यामुळे सर्वसमावेशक नागरिकांच्या प्राथमिक सोयी सुविधांमध्ये भर पडणार आहे याची पुन्हा खातरजमा करणे व कुठल्याही खाजगी स्वरुपाच्या कामांना मान्यता देण्यात आली नसल्याची खातरजमा करणे.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे संबंधित शहराच्या विकास नियंत्रण नियमावली व विकास आराखडयाशी सुसंगत असल्याची खातरजमा करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांना "ई-निविदा" कार्यप्रणालीचा अवलंब करणे बंधनकारक राहील.याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच शासनाने निर्गमित केलेल्या अद्यावत मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे."ई-निविदा" कार्यप्रणालीचा अवलंब करण्यात येत असल्याची खातरजमा करणे.

(ड) सदर प्रकल्पाअंतर्गत उपलब्ध करून दिलेला निधी त्याच उद्दिष्टासाठी खर्च करण्यात येत असल्याचे, काम गुणवत्तेनुसार झाले आहे किंवा कसे तसेच मंजूर कामावरच मंजूर निधी खर्च झाला आहे किंवा कसे हे पाहणे. तसेच दर सहा महिन्यांनी जिल्ह्यांतर्गत या योजनेखाली हाती घेण्यात आलेल्या कामांचा आढावा घेणे.

(इ) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामावर करण्यात येणा-या खर्चामुळे व निधी आहरीत करण्यामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही हे पाहणे.अशी बाब असल्यास सदरचा निधी आहरीत करू नये.

(ई) निधी खर्च करताना तो विहीत कार्यपध्दती अनुसरुन सर्व वित्तीय कायदे व नियमांचे तसेच विहीत प्रक्रियेचे अवलंबन करण्यात यावे. निधी खर्च करण्याबाबत वित्त विभागाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयातील सूचनांचा व वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत (Financial Power) भंग होणार नाही तसेच, कुठलाही शासन नियम/अधिकाराचा भंग होणार नाही हे पाहणे.

(फ) सदर योजनेअंतर्गत करण्यात येणाऱ्या रस्त्यांच्या कामांना इतर कोणत्याही योजनेमधून प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली नाही अथवा सदरची कामे करण्यात आलेली नाही याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करावी.

(ग) सध्या सुरू असलेल्या पाणीपुरवठा व मलनिस्सारणाच्या प्रकल्पामुळे प्रस्तावित रस्त्यांचे उत्खनन होणार नाही अशाप्रकारे कामांचे नियोजन करावे.प्रस्तावित रस्त्यांच्या ठीकाणांवरील पाणीपुरवठा व मलनिस्सारण प्रकल्पाची कामे पूर्ण झाल्यानंतरच सदर रस्त्यांची कामे होतील याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करावी.

(च) कामाच्या चुकीच्या नियोजनामुळे पाणीपुरवठा व मलनिस्सारणाच्या प्रकल्पामुळे नव्याने करण्यात येणा-या रस्त्यांचे उत्खनन होऊन निधीचा अपव्यय होणार नाही यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची राहील.

९. कार्यान्वयन यंत्रणेची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील:-

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गत दुरूस्तीची तथा परिरक्षणाची कामे हाती घेण्यात येत नाहीत हे पाहणे.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सुरू करण्यापुर्वीच्या स्थितीचे व काम झाल्यानंतरच्या कामाचे चित्र (Photograph) काढून ठेवणे व मागणीनुसार सादर करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांचे त्रयस्थ पक्षाकडून लेखापरिक्षण करून घेणे कार्यान्वयन यंत्रणेस बंधनकारक राहील.

१०. यापुर्वी या योजनेखाली झालेल्या खर्चाबाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे व सदर शासन निर्णयान्वये उपलब्ध करून दिलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित प्रपत्रात संबधित नागरी स्थानिक स्वराज्यसंस्थेकडून उपलब्ध करून घेऊन, संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करण्याची जबाबदारी संबधित जिल्हाधिकारी यांची राहील.तसेच, उपयोगिता प्रमाणपत्राची एक प्रत आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांचेकडे सादर करावी.

११. सदर शासन निर्णयानुसार मंजूर करण्यात येत असलेल्या निधी वितरणाबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

१२. संदर्भाधीन क्र. (१) येथील शासन निर्णयान्वये "नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान"या योजनेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, सदर शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील. सदरच्या अटी व शर्तीची पुर्तता झाल्याची व प्रकल्पास सक्षम प्राधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्याची खातरजमा करण्यात यावी.

१३. या लेखाशिर्षाखाली यापूर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने लेखापरीक्षण / महालेखापाल यांच्याकडून कोणतेही गंभीर आक्षेप नाहीत याची खातरजमा आहरण व संवितरण अधिकाऱ्याने करावी व गंभीर आक्षेप असल्यास निधी आहरीत करु नये.

१४. या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे या लेखाशिर्षाखाली यापुर्वी वितरीत केलेला निधी अखर्चित असल्यास, वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१०१५/प्र.क्र.१८/अर्थोपाय दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ व शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय दिनांक ६ जून,२००८ तसेच, नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-१११८/प्र.क्र.३०/न.वि.-०४, दिनांक १२ मार्च,२०१८, दिनांक ४ जून, २०१८, दिनांक ९ ऑगस्ट,२०१८, दिनांक १५ डिसेंबर, २०१८, दि.०१ जून, २०१९,दि.२६ फेब्रुवारी,२०२०, दि.११ जुन,२०२०,दि.२१ मे,२०२२, दि.२८ मार्च,२०२२, दि. २८ एप्रिल, २०२३ अन्वये कार्यवाही करावी.

१५. संदर्भाधीन क्र. (१) व (२) येथील शासन निर्णयामधील अन्य सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

०३/१०/२४

(श्रीकांत आंडगे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव मंत्रालय, मुंबई
२. विभागीय आयुक्त, कोकण
३. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय,बेलापूर भवन ७ वा मजला, नवी मुंबई - ४०० ६१४.
४. जिल्हाधिकारी,रत्नागिरी
५. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई
६. महालेखापाल, महाराष्ट्र-२,नागपूर
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

८. सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
१०. सहायक संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय,नवी मुंबई - ४०० ६१४
११. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, रत्नागिरी
१२. जिल्हा प्रशासन अधिकारी, रत्नागिरी
१३. मुख्याधिकारी, राजापूर नगरपरिषद, जि.रत्नागिरी
१४. वित्त विभाग, व्यय-३/ कोषा प्रशासन-५/अर्थसं-१६/नियोजन विभागमंत्रालय, मुंबई
१५. कार्यासन नवि-४ नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. निवड नस्ती (नवि-१६), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

# परिशिष्ट तीन
# समितीच्या बैठका

## पहिली बैठक

विधानपरिषद विनंती अर्ज समितीची बैठक सोमवार, दिनांक ३ ऑक्टोबर, २०२४ रोजी दुपारी ०३.०० वाजता, कक्ष क्रमांक १४५ पहिला मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थिती :**

डॉ.(श्रीमती) नीलम लतिका दिवाकर गोऱ्हे, मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख

**विशेष निमंत्रित :**

श्री. राजेश राठोड, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

डॉ. विलास आठवले, सचिव (२) (कार्यभार)

श्री. सुरेश मोगल, अवर सचिव (समिती)

**साक्षीदार**

(१) ॲड. (श्रीमती) हुस्नबानु खलिफे, माजी वि.प.स.

(२) श्री. अजिम अ. रहिमान सुर्वे

(३) श्री. खलील सुर्वे

(४) श्री. एस. एस. ठाकूर

(५) श्री. हरिस एम. शेखसन

(६) श्री. गौण महमद इसाक खतीब

**मंत्रालयीन विभागीय सचिव/अधिकारी**

(१) श्री. श्रीकांत आंडगे, उप सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई

(२) श्री. चेतन विसपुते, मुख्याधिकारी, नगर परिषद, राजापूर

(३) श्री. अविनाश शितोळे, कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई

(४) श्री. केशव ज.जाधव, सहायक कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई

(५) श्री. स्वप्नील द. पडवार, नगर परिषद अभियंता , ता. राजापूर

## दुसरी बैठक

विधानपरिषद विनंती अर्ज समितीची बैठक गुरुवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२४ रोजी दुपारी २.३० वाजता, मा. उप सभापती यांचे दालन, विधान भवन, नागपूर येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थिती :**

**(१) डॉ. (श्रीमती) नीलम लतिका दिवाकर गोऱ्हे, मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख**

(२) श्रीमती उमा खापरे, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(१) श्री. सचिन अहिर, वि.प.स.

(२) श्री. सत्यजित तांबे, वि.प.स.

(३) श्री. राजेश राठोड, वि.प.स.

**<u>महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :</u>**

डॉ. विलास आठवले, सचिव (२) (कार्यभार)

श्री. सुरेश मोगल, अवर सचिव (समिती)

श्रीमती सुषमा लोंढे, कक्ष अधिकारी

सदर बैठकीत समितीने प्रारुप अहवालावर विचारविनिमय करून तो समंत केला.

शासकीय, मुद्रणालय, नागपूर